**Reading comprehension**

# कुत्रा

कुत्रा हा पाळीव प्राणी आहे. कुत्र्याला चार पाय, दोन कान, दोन डोळे, एक शेपटी, एक तोंड, आणि एक नाक असते. कुत्री १२ ते १३ वर्ष जगू शकतात. कुत्र्याचे वय त्यांच्या आकारावर अवलंबून असते, जसे की लहान कुत्री अधिक आयुष्य जगतात. कुत्र्यांचे त्यांच्या कामानुसार वर्गीकरण केले जाते, जसे की संरक्षक कुत्रे, पाळीव कुत्रे, शिकारी कुत्रे, पोलिस कुत्रे, मार्गदर्शक कुत्रे, स्निफर डॉग असे काही. कुत्रे घरात सुद्धा पाळले जातात आणि शिकारीला सुद्धा सोबत नेले जातात. त्यांना वासाची तीव्र शक्ती असते. कुत्रा खूप खूप वेगाने धावतो, जोरात भुंकतो आणि अनोळखी लोकांवर हल्ला करतो. कुत्रा हा अतिशय हुशार प्राणी असून चोरांना पकडण्यात त्याचा खूप उपयोग होतो. जगात सर्वत्र कुत्रे आढळतात. कुत्रा हा अतिशय विश्वासू प्राणी आहे.

प्रश्न:

१. कुत्रा कोणता प्राणी आहे?

२. कुत्र्याचे वर्गीकरण सांगा?

३. कुत्रा घरात ठेवता येतो का?

४. कुत्रा कसा प्राणी आहे?

५. तुम्ही पहिलेल्या पाळीव प्राण्याचे वर्णन करा?

© Copyright. Material used by BMM Marathi Shala only. All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

# छत्रीची आत्मकथा

मी एक छत्री बोलत आहे. छत्री म्हणजे, ऊन आणि पाऊस यापासून रक्षण करण्यासाठी बनवलेली वस्तू. मी पावसापासून तुमचे रक्षण करते. पावसाळ्याच्या दिवसात तुम्ही मला आजूबाजूला वेगवेगळ्या रंगात सहज पाहू शकता. या दिवसांमध्ये माझी खूप काळजी घेतली जाते. मला प्रेम आणि सन्मानाने ठेवले जाते. या शिवाय उन्हाळ्यातही माझा उपयोग केला जातो. उन्हाळ्याच्या दिवसातील तीव्र उन्हापासून शरीराचे संरक्षण करण्यासाठी मला वापरले जाते. फार पुर्वी वनस्पतींची पाने वापरून छत्री बनवली जात असे. आताच्या काळात वेगवेगळ्या वस्तूपासून छत्री बनवली जाते. भारतात माझा पूर्वीपासून मुक्काम आहे. मी सामर्थ्याचे प्रतीक आहे. शिवाजी महाराजांना राज्याभिषेकानंतर, ‘छत्रधारी’ हा किताब बहाल करण्यात आला होता.

प्रश्न:

१. आत्मकथा म्हणजे काय?

२. तुम्ही छत्री वापरता का?

३. छत्रीचा उपयोग काय आहे?

४. उन्हाळ्यात छत्री का वापरावी?

© Copyright. Material used by BMM Marathi Shala only. All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

## Listening comprehension

# फुलपाखरू

फुलपाखराचे शरीर लांबट असून त्याचे डोके, छाती व पोट असे तीन भाग पडतात. डोके लहान व गोलाकार असते. डोक्याच्या दोन्ही बाजूंवर दोन मोठे डोळे असतात. पंख मोठे, व रंगीबेरंगी असतात. प्रत्येक पंखावर आडव्या व उभ्या रेषांचे एक जाळे तयार झालेले असते. फुलपाखरांचे शरीर हलके, आणि पंख मजबूत व मोठे असल्याने, बराच वेळे पर्यंत ती हवेत सारखी उडत राहतात. कित्येक जातींची फुलपाखरे एका भागातून दुसऱ्या भागात, व कधी कधी एका देशातून दुसऱ्या देशातसुद्‌धा स्थलांतर करतात. अशी स्थलांतरे बहुधा ठराविक ऋतूत दक्षिणेकडून उत्तरेकडे केली जातात. फुलपाखरे आपल्या आयुष्यात एक ते दोन वेळा स्थलांतरे करतात. ही फुलपाखरे हवेत तासनतास उडत राहतात व डोंगर, नद्‌या, समुद्र इ. अडथळे सहज पार करू शकतात.

प्रश्न:

१. फुलपाखरांच्या शरीरात किती भाग असतात?

२. फुलपाखरांच्या शरीराचे भाग सांगा?

३. फुलपाखरे स्थलांतर करतात का?

४. फुलपाखरे समुद्र ओलांडून स्थलांतर करतात का?

५. फुलपाखरे त्यांच्या आयुष्यात किती वेळा स्थलांतर करतात?

© Copyright. Material used by BMM Marathi Shala only. All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**'चांद्रयान-३'**

२३ ऑगस्ट २०२३ रोजी 'चांद्रयान-३' हे अंतराळ यान चंद्रावर सुरक्षितपणे लँड झालं. भारताची चंद्र मोहीम यशस्वीपणे पार पडली. ज्या ठिकाणी लँड झालं, ती जागा आता 'शिवशक्ती' या नावाने ओळखली जाणार आहे. चंद्राच्या या भागात सॉफ्ट लँडिंग करणारा भारत हा पहिला देश ठरला. 'चांद्रयान-३' चा प्रवास हा खरंतर 'चांद्रयान-१' च्या यशानंतरच सुरू झाला होता. पहिल्या चांद्रयानाने, चंद्रावर पाण्याचे अंश असल्याचा शोध लावला होता. 'चांद्रयान-३' चंद्रावरील जमिनीचा अभ्यास करेल. भारताच्या या यशाचे श्रेय नक्कीच पूर्णपणे इस्रोच्या वैज्ञानिकांचं आहे. 'चांद्रयान-३' या मोहिमेत ५४ महिला शास्त्रज्ञांचा सहभाग होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या ऐतिहासिक यशासाठी भारतीयांचे आणि इस्रोचे अभिनंदन केले.

प्रश्न :

१. चांद्रयान हे काय आहे?

२. 'चांद्रयान-३' हे चंद्रावर सुरक्षितपणे किती तारखेला लँड झालं?

३. 'चांद्रयान-३' या मोहिमेत किती महिला शास्त्रज्ञांचा सहभाग होता?

४. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कोणाचे अभिनंदन केले?

५. 'चांद्रयान-३' चे तुमच्या शब्दात वर्णन करून सांगा?

© Copyright. Material used by BMM Marathi Shala only. All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.